# महासागर नागपूर वृत्तसागर

■ गुरुवार, दि. ९, ऑक्टोबर २०२५ ■


## पोलिसासह दोघांवर अत्याचाराचा गुन्हा

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ८ :

वेगवेगळ्या घटनांमध्ये लग्नाचे आमिष दाखवून लैंगिक शोषण केल्याप्रकरणी एका पोलिसासह दोघांवर अत्याचाराचा गुन्हा नोंदविण्यात आला आहे. कपिलनगर आणि बेलतरोडी ठाण्यांतर्गत ही प्रकरणे उघडकीस आली आहेत. कपिलनगर पोलिसांनी पीडितेच्या तक्रारीवरून आरोपी उमेश तुळशीराम शेळके (२६) विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, उमेश शेळके हा पोलिस मुख्यालयात तैनात आहे. पीडित युवती ही कपिलनगर ठाण्यांतर्गत मेस चालवते. उमेश तिच्या मेसमध्ये जेवण करण्यासाठी जात होता. या दरम्यान उमेशने पीडितेला प्रेमाच्या जाळ्यात अडकवले. लग्नाचे आमिष दाखवून ओयो हॉटेल स्पिच इन व इतर ठिकाणी घेऊन जात तिचे लैंगिक शोषण केले. पीडितेने उमेशकडे लग्नासाठी तकादा केला असता त्याने पोलिस असल्याचा रौब दाखवत लग्न करण्यास नकार दिला. यावरून दोघांमध्ये वाद झाला. पीडितेने कपिलनगर ठाण्यात आरोपीविरुद्ध तक्रार दाखल केली. पोलिसांनी उमेशविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

अशीच एक दुसरी घटना बेलतरोडी पोलिस ठाण्यांतर्गतही पुढे आली आहे. पीडित युवती गोंदियाच्या गोरेगाव येथील रहिवासी आहे. जवळपास २-३ वर्षांपूर्वी ती कामाच्या शोधात नागपुरात आली होती. या दरम्यान तिची भेट स्वप्निल संजय पाटील (३६) रा. भक्ती पार्क, वेळाहरी याच्याशी झाली. स्वप्निलने तिला काम मिळवून देण्याच्या बहाण्याने जाळ्यात अडकवून मैत्री गाठली. दोघांमध्ये बोलचाल सुरू झाली.

### अवैध धंद्याच्या आहारी गेलेल्या लोकांना सावरण्यासाठी

# शासनासमवेत समाजाची सकारात्मकता महत्वाची

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ८ :

कोणत्याही अवैध प्रकारचा मार्ग हा अधोगतीकडे नेणारा असतो. जागृत समाजाचे ते लक्षण नसून जे कोणी अशा मार्गाला वळले आहेत त्यांना अशा अवैध मार्गापासून परावृत्त करण्यासह नवीन संधीसाठी व रोजगारासाठी शासनासह समाजही तत्पर असणे महत्वाचे आहे. तिडंगी येथील अवैध दारु व्यवसायाकडे वळलेल्या लोकांना त्यांच्या आवडीनुरुप विधायक मार्ग मिळावेत, स्वयंरोजगार मिळावा यासाठी शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळावा याहृष्टीने पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा प्रशासन तत्पर असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी केले.



तिडंगी गावातील आदिवासी पारधी विकास परिषदेतर्फे करण्यात आलेल्या विविध मागण्यांबाबत आज जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी परिषदेच्या शिष्टमंडळासमवेत चर्चा केली. आमदार डॉ.आशिष देशमुख यांच्या नेतृत्त्वात हे शिष्टमंडळ भेटले. निवासी उपजिल्हाधिकारी अनुप खांडे, आदिवासी पारधी विकास परिषदेचे अध्यक्ष बबन गोरामन, उपाध्यक्ष सतीश माळी, जिल्हाध्यक्ष अनिल पवार व समाजातील विविध पदाधिकारी या वेळी उपस्थित होते.

आदिवासी समाजासाठी शासनाच्या विविध योजना या लाभधारकांच्या गरजेनुरुप कशा देता येतील याचा विचार केला पाहिजे. याहृष्टीने नियोजन करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी आदिवासी विकास विभागाच्या प्रकल्प संचालकांना दिले. एखादा नवा व्यवसाय निवडतांना लाभधारकाचा पसंतीक्रम हा आवश्यक असतो. ज्यांना शेळी पालनात रस असेल अशा व्यक्तींसाठी शेळीपालन तर इतर व्यक्तीला दुसरा व्यवसाय करावा वाटत असेल तर तो दिला पाहिजे. कुटीर उद्योग यासह आदिवासी शबरी योजना व इतर विविध योजना प्रभावीपणे त्यांच्यापर्यंत पोहचल्या पाहिजेत, असे ते म्हणाले. याहृष्टीने तिडंगी येथे एक स्वतंत्र शिबीर घेण्याचेही निर्देश त्यांनी दिले. महिला सशक्तीकरणाच्या माध्यमातून विविध योजना तिडंगी येथे आदिवासी पारधी समाजाच्या घराघरात पोहचल्या पाहिजेत. यासाठी शिलाई मशिन व इतर योजना प्रभावीपणे राबविण्याच्या सूचना आमदार डॉ. आशिष देशमुख यांनी दिल्या. जिल्ह्यात 42 ठिकाणी असलेल्या आदिवासी पारधी वस्त्यांवर विशेष कॅम्प घेण्याचे या बैठकीत ठरले.

## वारांगणेवर चाकूने हल्ला

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ८ :

सोबत येण्यास नकार दिल्यावरून गुंडांनी एका वारांगणेवर चाकूने हल्ला केला. रक्तबंबाळ करून आरोपी दुचाकीवर बसून फरार झाले. या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे. लकडगंज पोलिसांनी गुन्हा नोंदवून आरोपींचा शोध सुरू केला आहे.

पीडित ३० वर्षीय महिला गंगा-जमुना वस्तीत देहविक्री करून उदरनिर्वाह करते. रविवारी रात्री ती आपल्या खोलीकडे जात होती. रस्त्यात २५ ते ३० वर्षे वयोगटातील तीन तरुणांनी तिचा रस्ता अडवला. एकाने तिला त्यांच्यासोबत येण्यास विचारले. महिलेने नकार दिला असता आरोपींनी तिला जबरीने मोटारसायकलवर बसविण्याचा प्रयत्न केला. पीडितेने विरोध केला असता आरोपी चिडले. त्यांनी महिलेला मारहाण करण्यास सुरूवात केली. तीक्ष्ण शस्त्राने सपासप वार करून रक्तबंबाळ केल्यानंतर आरोपी तेथून फरार झाले. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली. घटनेची माहिती पोलिसांना देऊन जखमी महिलेला उपचारार्थ रुग्णालयात भरती करण्यात आले. पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. आरोपीला अटक झालेली नाही.

## जिनिंग ट्रेनिंग सेंटर, आयसीएआर सिरकॉट येथे जागतिक कापूस दिन साजरा



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ८ :

नागपूर येथील जिनिंग ट्रेनिंग सेंटर (जीटीसी), आयसीएआर-केंद्रीय कापूस तंत्रज्ञान संशोधन संस्थो (सिरकॉट) ने भारतीय वस्त्रोद्योग उद्योग संघ - कॉटन डेव्हलपमेंट अँड रिसर्च असोसिएशन (सीआयटीआय- सीडीआरए), मुंबई यांच्या सहकार्याने 7 ऑक्टोबर 2025 रोजी नागपूर येथील जीटीसी येथे जागतिक कापूस दिन साजरा केला. जागतिक नैसर्गिक फायबर म्हणून कापसाचे महत्त्व जाणून घेणे, उत्पादकता आणि फायबरची गुणवत्ता सुधारण्यासाठी तांत्रिक नवकल्पनांना प्रोत्साहन देणे हा या कार्यक्रमाचा उद्देश होता.

या कार्यक्रमात नागपूर येथील कापूस विकास संचालनालयाचे संचालक डॉ. ए. एल. वाघमारे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. नागपूर येथील जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रवींद्र मनोहरे,विदर्भ कापूस संघटनेचे अध्यक्ष भावेश शाहआणि वर्धा येथील दफ्तरी ॲकग्रो-बायोटेकचे रवींद्र जी. दफ्तरीसन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित होते. नागपूर येथील जीटीसीच्या प्रभारी अधिकारी आणि वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. वर्षा सातनकर, जी.एच. वैराळे, समन्वयक, मुंबई आणि डॉ. के. पांडियन, वरिष्ठ शास्त्रज्ञ, जीटीसी, नागपूरउपस्थित होते. डॉ. वर्षा सतानकर यांनी सर्व पाहुण्यायचे स्वागत केले आणि कार्यक्रमाचा आढावा सादर केला. त्यांनी कापसाच्या तंतूची गुणवत्ता, कापसाच्या उप-उत्पादनांमध्ये मूल्यवर्धन आणि कापसावरील तंत्रज्ञान अभियान अंतर्गत उत्पादकता वाढवणे आणि शेतकऱ्यांना आधार देणे या उद्देशाने विविध उपक्रमांवर प्रकाश टाकला.

त्यांनी शेतकऱ्यांना योग्य परतावा मिळवण्यासाठी चांगल्या विपणन धोरणांचे आवाहन केले. रवींद्र मनोहरे यांनी डिजिटल शेतकरी आयडी तयार करून आणि पीक-संबंधित माहितीसाठी अक-आधारित मोबाइल अनुप्रयोग वापरून स्मार्ट शेतकरी बनण्यास प्रोत्साहित केले. श्री भावेश शाह यांनी भारताची निर्यात क्षमता वाढवण्यासाठी स्वीकारणे, लिंट टक्केवारी वाढवणे आणि कापसाच्या ट्रेसबिलिटी खात्री करणे यावर भर दिला. प्रमुख भाषण देताना, डॉ. ए. एल. वाघमारे यांनी जागतिक आणि भारतीय कापसाच्या उत्पादकतेची तुलना केली आणि तांत्रिक प्रगती आणि शेतकरी शिक्षणाद्वारे उत्पादन सुधारणे, निर्यात वाढवणे आणि आयात कमी करणे यावर भर दिला. तांत्रिक सत्रात, इंजी. डी. यू. पाटील यांनी कापसातील दूषिततेच्या समस्येबद्दल भाष्य केले.



## नागपूरमध्ये दोन दिवसीय राष्ट्रीय संगोष्ठीचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ८ :

भारतीय वैद्यक समन्वय समिती संचालित श्री आयुर्वेद महाविद्यालय, हनुमाननगर, नागपूर यांच्या वतीने दोन दिवसीय राष्ट्रीय संगोष्ठी व कार्यशाळेचे आयोजन ११ व १२ ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात आले आहे. या संगोष्ठीमध्ये पं. रामनारायण शर्मा स्मृती व्याख्यान, तज्ज्ञांचे विशेष सत्र व कार्यशाळा, तसेच शोधपत्र व पोस्टर सादरीकरण यांचा समावेश आहे. सुमारे २०० हून अधिक शोधपत्र सादर होणार असून, संपूर्ण भारतातून ८५० हून अधिक प्रतिनिधी सहभागी होणार आहेत.

उद्घाटन समारंभासाठी डॉ.कौस्तुभ उपाध्याय सलाहकार, आयुष विभाग, हे उद्घाटक तर सुरेश शर्मा, अध्यक्ष, डॉ.अतुल बाबू वार्ष्णेय, डॉ. पवनकुमार गोदतवार (तांत्रिक सल्लागार, WHO व प्राध्यापक, ठकअ, जयपूर) व डॉ. मनोज निबांळकर उपस्थित राहतील.

## संघ गंगा के तीन भगीरथ नाटकाचा १४ ऑक्टोबर रोजी सुवर्ण महोत्सवी प्रयोग



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ८ :

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षाचे औचित्य साधून संघाच्या तीन प्रथम सरसंघचालकांच्या कार्यावर आधारित द्विअंकी नाटक संघ गंगा के तीन भगीरथ या नाटकाचा सुवर्ण महोत्सवी प्रयोग येत्या मंगळवार, 14 ऑक्टोबर 2025 रोजी रात्री 7.30 वा. रवींद्र नाट्य मंदिर, प्रभादेवी (सिद्धिविनायक मंदिराजवळ), मुंबई येथे सादर केला जाणार आहे, अशी माहिती राधिका क्रिएशन्सचे संचालक व नाटकाचे दिग्दर्शक संजय पेंडसे यांनी पत्रकार परिषदेत दिली. या विशेष प्रयोगाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार असून उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे ,महसूल मंत्री, चंद्रशेखर बावनकुळे, सूचना तंत्रज्ञान व सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार, तसेच राज्यमंत्री ॲड आशिष जयस्वाल यांची कार्यक्रमाला विशेष उपस्थिती राहील.

या नाटकाचा 51 वा प्रयोग 15 ऑक्टोबर रोजी सकाळी 11 वा. गडकरी रंगायतन, ठाणे येथे होणार आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ प्रचारक रवींद्र भुसारी या नाटकाचे मार्गदर्शक असून लेखक श्रीधर गाडगे आहेत. दिग्दर्शन संजय पेंडसे, नेपथ्य सतीश पेंडसे, संगीत डॉ. भाग्यश्री चिटणीस यांचे असून सूत्रधार राधिका देशपांडे आहेत. निर्मात्या सारिका पेंडसे आहेत तर ॲड. रमण सेनाड, निलीमा बावणे, अरुणा पुरोहित यांचे निर्मिती सहाय्य लाभले आहे.

## सावजी भोजनालयाला ठोकले कुलूप

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ८ :

विना परवानगी ग्राहकांना पिण्यासाठी दारू उपलब्ध करण्यासाठी परिमंडळ क्र. १ चे पोलिस उपायुक्त ऋषिकेश रेड्डी यांनी बजाजनगर परिसरातील समाधान भोजनालयावर कारवाई करीत आठवडाभरासाठी कुलूप ठोकले आहे. यापूर्वीही २०२३, २०२४ आणि याच वर्षी मार्च महिन्यात भोजनालयावर कारवाई करण्यात आली होती. वारंवार कारवाई करूनही संचालकांकडून भोजनालयात येणाऱ्या ग्राहकांना दारू उपलब्ध केली जात असल्यामुळे ही कारवाई करण्यात आली आहे. विशेष म्हणजे या भोजनालयात रात्रीला विविध क्षेत्रातील प्रतिष्ठीतांची मैफल जमत होती. समाधान सावजी भोजनालयात ग्राहकांना दारू उपलब्ध केल्या जात आहे. या माहितीच्या आधारावर उपायुक्तांनी त्यांच्या पथकाला तेथे धाड टाकण्याचे आदेश दिले. यावेळी हॉटेलमध्ये येणाऱ्या ग्राहकांना टेबलवर दारू उपलब्ध केली जात असल्याचे आढळले. पोलिसांनी हे हॉटेल रविवारपासून ७ दिवसांसाठी बंद ठेवण्याचे आदेश दिले.



■ *नागपूर : नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी मतदार यादीमध्ये नाव नोंदवण्यासाठी अर्ज भरला. यावेळी गडकरी यांच्या निवासस्थानी नागपूर भाजपचे अध्यक्ष दयाशंकर तिवारी, नागपूर विभागाचे नोंदणी प्रमुख माजी आमदार सुधाकर कोहळे, सहनोंदणी प्रमुख सुधीर दिवे, नागपूर शहर नोंदणी प्रमुख गिरीश देशमुख, माजी उपमहापौर संदीप जाधव, भाजपचे नागपूर शहर महामंत्री श्रीकांत आगलावे, महामंत्री धावडे, भाजपचे नागपूर शहर संपर्क प्रमुख विष्णू चांगदे आदींची उपस्थिती होती.*



■ *नागपूर : पतीच्या दीर्घायुष्यासाठी सौभाग्यवतींनी करावयाचे करवा चौथ हे व्रत शुक्रवारी साजरे केले जाणार आहे. त्यानिमित्त करावयाच्या पुजेसाठी बाजारात मातीचे रंगीत छोटे मटके विक्रीसाठी आले आहेत. करवा चौथच्या पार्श्वभूमिवर मेंहदी काढण्यासाठी महिलांची लगबग सुरू आहे.*

## मुक्तिवीर नाट्य प्रयोगाने प्रेक्षक भारावले



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ८ :

भव्य राजवाडा, जंगल, नयनरम्य बगीचा, थरारक तलवारबाजी आणि अंगावर रोमांच उभे करणारी वाघाशी झुंज अशा प्रसंगांसह चतुर्थकालातील पौराणिक पार्श्वभूमी असलेले मुनिश्री देशभूषण आणि कुलभूषण यांच्या जीवनावर आधारित मुक्तीवीर हे भव्य नाटक मंगळवारी कविवर्य सुरेश भट सभागृहात अखिल दिगंबर जैन सैतवाळ संस्थेतर्फे प्रेक्षकांच्या भरगच्च उपस्थितीत सादर करण्यात आले. डॉ रवींद्र भुसारी लिखित आणि प्रमोद भुसारी दिग्दर्शित या गीत आणि संगीतप्रधान नाटकात ४० कलाकारांचा सहभाग होता.

कोजागिरी पौर्णिमेच्या निमित्ताने अखिल दिगंबर जैन सैतवाल संस्थेचे राष्ट्रीय महामंत्री नितीन नखाते यांच्या संयोजनात सकल जैन समाजासाठी या नाटकाचे विशेष आयोजन करण्यात आले होते. नाट्य प्रयोगाचे दीप प्रज्वलन करून रमेश तुपकर, भरतेश नखाते, राजेश गडेकर, प्रफुल्ल मारवडकर, नितीन नखाते, सतीश जैन पेंढारी, पंकज बोहरा, जितेंद्र तोरावत, अरुण श्रावणे, सुरेश अवथनकर, किशोर मेंढे, दिलीप राखे, सुनील जैन पेंढारी, मनोज बंड, हरीश श्रावणे, राजेंद्र नखाते, डॉ. रवींद्र भुसारी, सुनील फरसुले, सुभाष मचाले यांनी केले. रत्नमाला जयकुमार भुसारी यांचा याप्रसंगी विशेष सत्कार करण्यात आला.

गीतकार डॉ. रवींद्र भुसारी यांच्या गीतांना राजेश तितरमारे यांनी संगीताचा साज चढविला होता तर स्वरसाज चढविला श्रुती पांडवकर, मनीष मोहरील आणि मोरेश्वर निस्ताने यांनी केले. नृत्यदिग्दर्शन चिन्मयदेशकर आणि जिया खंडेलवाल यांचे होते.

देशभूषणच्या भूमिकेत अभिलाष भुसारी, कुलभूषणच्या भूमिकेत रौनक पळसापुरे, राजा प्रमोद भुसारी,महाराणी डॉ. सुचित्रा भुसारी, राजकुमारी कमलावती अस्मिता पाटील, सखी स्वराली तुपकर, राजगुरू अतुल भुसारी, प्रधानजी डॉ. नरेंद्र भुसारी, आत्माराम राजेश चवडे, वीरभद्र अनिल इंदाणे, तानसेन आलोक पळसापुरे, वीरसेन प्रीतम भागवतकर, राजदूत प्रा. प्रशांत पांडवकर, कथाकार प्रा. अजय वेखंडे, ऋषीः गिरीश विटाळकर आणि उमेश फुलंबरकर, बाल राजकुमार ईश्वरी नखाते, संयुक्ता पनवेलकर, प्रियांशु सुपलकर आणि देवांशू सुपलकर, गावकरी प्रगती नखाते, सायली भुसारी थेरे, मनीषा शहाकार, वैशाली पांडवकर, स्वराली चवडे, निकिता मुधोळकर, धनश्री कापसे, प्रियंका कळमकर, निर्मिती डोणगावकर, प्रियंका जैन, श्रुतिका जोहरापूरकर, प्रियंका महात्मे, मधुमिता खेडकर, आरती कहाते, वैशाली जैन, नेत्रा खेडकर, अर्निका जैन, प्रकाश वाकेकर आदींनी आपल्या भूमिकेत रंग भरला.

# आपल्या व्यावसायिक कल्पनांना साकारण्यासाठी कृतीची जोड द्या

### कार्यकारी कुलगुरु डॉ. माधवी खोडे-चवरे

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ८ :

विद्यार्थ्यांना आपल्या स्वयंरोजगाराचे मार्ग मिळणे सुलभ व्हावेत, आपल्या मनातील कल्पना शक्तींना व्यावसायिक आकार देता यावा यासाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातर्फे आम्ही विविध पातळीवर प्रयत्नरत आहोत. विद्यापीठ परिसरात यासाठी स्वतंत्र इनक्युबिशन सेंटर कार्यरत केले आहे.

याचबरोबर विद्यार्थ्यांना सर्व प्रकारच्या रोजगार व स्वयंरोजगाराबाबतची माहिती ॲपच्या माध्यमातून उपलब्ध व्हावी यासाठी आरटीएमएनयु स्टुडंट डेव्हलपमेंट ॲप विकसीत केले आहे. व्यवसायाबाबत आपली जी काही कल्पना असेल त्या कल्पनेला प्रत्यक्ष साकारण्यासाठी तत्पर व्हा,




असे आवाहन अपर विभागीय आयुक्त तथा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कार्यकारी कुलगुरु डॉ. माधवी खोडे-चवरे यांनी केले.

महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र नागपूर विभाग व महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने विभागीय पातळीवरील नवउद्योजकांच्या क्षमता विकास कार्यक्रमांतर्गत आयोजित प्रशिक्षणाच्या उद्घाटन समारंभात त्या बोलत होत्या. विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहात आयोजित कार्यक्रमास सिडबीच्या एस. लक्ष्मी, बी. आर. शिरसाट, जिल्हा माहिती अधिकारी विनोद रापतवार, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राच्या राज्य समन्वयक श्रीकांत कुलकर्णी, विभागीय अधिकारी एच. आर. वाघमारे, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक शिवकुमार मुद्दमवार, अनिल पाटील व मान्यवर उपस्थित होते.

युवकांनी आपल्या मनात जर एखाद्या व्यवसायाची कल्पना आली तर त्याला प्रत्यक्षात साकारण्यासाठी तत्काळ निर्णय घेऊन स्वतःच्या कष्टाची जोड दिली पाहिजे. आपल्यात क्षमता विकसीत करुन घेतल्या पाहिजेत.

कोणताही व्यवसाय हा लहानातून मोठा होत जातो. त्यासाठी छोट्यातील छोटी सुरुवात ही तेवढीच महत्वाची ठरते असे कार्यकारी कुलगुरू डॉ. माधवी खोंडे-चवरे यांनी सांगून जे व्यवसाय करत आहेत त्यांनी त्यात अधिक मूल्यवृध्दी, सुलभता आणण्यावर भर दिला पाहिजे, असे सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक एच. आर. वाघमारे यांनी केले. कोरोना काळात अनेक लहान उद्योग व्यवसायांना व्यवसायाअभावी अनेक आव्हानांना तोंड द्यावे लागले. यातून त्यांना सावरण्यासाठी सूमारे 9 हजार लघु उद्योगांना प्रशिक्षण देऊन क्षमता वृध्दी करण्यात आली आहे.

हा उपक्रम क्षमता वृद्धीचा भाग असून आजवर सूमारे 18 लाख उद्योजक उद्योग विभागाने घडविल्याचे वाघमारे यांनी सांगितले. भारतात 36 टक्के उत्पादन हे लघु उद्योजकांच्या मार्फत केले जाते. 45 टक्के आपण एक्सपोर्ट करतो. रॅम्प हा केंद्र पुरस्कृत कार्यक्रम असून यात विविध बाबींचे प्रशिक्षण आम्ही पूर्ण करीत असल्याची माहिती बी.आर. शिरसाट यांनी दिली.

# वानाडोंगरी नगरपरिषदेचे नगरसेवक पदासाठी आरक्षण जाहीर

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. ८ :




वानाडोंगरी नगरपरिषदेचे नगरसेवक पदासाठी आरक्षण नगरपरिषद कार्यालय वानाडोंगरी येथे लहान मुलांच्या हाताने चिठ्ठी काढून जाहीर करण्यात आले. याप्रसंगी पीठासीन अधिकारी निलेश जैन व वानाडोंगरी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी राहुल परिहार उपस्थित होते.

एकूण 24 नगरसेवक पदासाठी आरक्षण काढण्यात आले. सर्व प्रथम अनुसूचित जातीसाठी तिन, जमाती साठी एक, नागरीकांच्या मागास प्रवगार्साठी सहा जागा तर सर्वसाधारण साठी एकूण १४ जागा आरक्षित करण्यात आल्या. अनुसूचित जातीसाठी प्रभाग क्रमांक- १,३,९ आरक्षित असून १ व ३ महिलांकरिता आरक्षित आहे.

प्रभाग-११ अनुसूचित जमातीच्या महिलांसाठी आरक्षित आहे.प्रभाग क्रमांक- ४,५,६,७,८ व १० हे सहा प्रभाग नागरिकांच्या मागास प्रवगार्साठी आरक्षित झाले असून यापैकी प्रभाग - ५,८ व १० हे तिन प्रभाग महिलांकरिता राखीव झाले.उर्वरीत एकूण १४ जागा या सर्वसाधारण प्रवगार्साठी असून प्रभाग क्रमांक - २,४,६,७,९ व १२ या सहा जागा महिलांकरिता आरक्षित आहेत. तर इतर आठ जागा सर्वसाधारण गटासाठी आरक्षित आहेत.पिठासीन अधिकारी निर्भय जैन व वानाडोंगरी मुख्याधिकारी राहुल परिहार यांच्या प्रमुख उपस्थितीत ही प्रक्रीया अतिशय पारदर्शकपणे संपन्न झाली. दोन लहान चिमुकल्यांनी महिला आरक्षण सोडतीत मोलाचे सहकार्य केले. यावेळी भाजपचे माजी नगरसेवक व सेना, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, वंचित, बसपा व जनसंघर्ष समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

## रन फॉर फन मॅरेथॉनचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ८ :

फेटरी येथील डी.ए.वी. राव हरिश्चंद्र आर्य पब्लिक स्कूलतर्फे २ किलो मीटर थीम रन डीएव्ही रन फॉर फन चे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन राष्ट्रीय मास्टर खेळाडू भारत चोखांद्रे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी आपल्या प्रेरणादायी मार्गदर्शनात विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच खेळ आणि फिटनेसचा अंगीकार करण्याचे आवाहन केले.प्राचार्या डॉ. तुलसी सक्सेना यांनी सांगितले की ही मॅरेथॉन महात्मा गांधी यांच्या शिकवणीवर आधारित असून, विद्यार्थ्यांमध्ये आरोग्य, शांती आणि एकता यांचे मूल्य रुजविण्याचा यामागील उद्देश आहे.आयोजन समितीच्या प्रयत्नांचे त्यांनी कौतुक केले आणि तरुण पिढीला प्रेरित केल्याबद्दल प्रमुख अतिथी भारत चोखांद्रे यांचे आभार मानले.

# तहसील कार्यालयासमोरील चिखलाच्या पाण्यामुळे अर्जनविसांचे काम विस्कळीत

■ महासागर प्रतिनिधी
कामठी, दि. ८ :

तहसील कार्यालयात पावसाचे प्रचंड पाणी साचल्याने आणि चिखलामुळे तहसील कार्यालयाचा परिसर सध्या चर्चेत आहे, ज्यामुळे सामान्य नागरिकांच्या कामावरच नव्हे तर रोजगारासाठी तहसील कार्यालयासमोर बसणाऱ्या अर्जन्विस (दस्तऐवज लेखक/ अर्ज लेखक) यांच्या कामावरही गंभीर परिणाम झाला आहे.



तहसीलदारांकडून तोडगा काढण्याची मागणी

कार्यालयाच्या आवारात काम करणाऱ्या अर्जन्विस (सामान्यतः अर्ज लेखक म्हणून ओळखले जाणारे) यांची अवस्था सर्वात वाईट आहे. जिथे ते पूर्वी व्यवस्थित बसून सरकारी योजना, शेती आणि रिअल इस्टेटशी संबंधित महत्त्वाची कागदपत्रे तयार करायचे, तिथे आता त्यांना साचलेल्या पाण्यामध्ये इकडे तिकडे बेशिस्तपणे बसावे लागत आहे. या गोंधळामुळे त्यांच्या व्यवहारांवर थेट परिणाम होत आहे. संबंधीत नागरिकांना त्यांच्यापर्यंत पोहोचण्यातही अडचणी येत आहेत, ज्यामुळे त्यांच्या व्यवसायांवर नकारात्मक परिणाम होत आहे. दररोज, शहरी आणि ग्रामीण भागातील नागरिक जसे संजय गांधी निराधार योजना, आधार कार्ड, रेशनिंग आणि मालमत्तेशी संबंधित कामांसाठी तहसील कार्यालयात मोठ्या संख्येने येतात.

कपडे खराब होऊन फिरत असल्याने लोकांना मोठी गैरसोय होत आहे, तर वाहने रस्त्याने जाणाऱ्यांच्या कपड्यांवर घाणेरडे पाणी शिंपडत आहेत, ज्यामुळे नागरिकांमध्ये सतत संताप आहे. कंपाऊंड वॉलला लागून असलेल्या नाल्याची साफसफाई न झाल्यामुळे ही संपूर्ण समस्या उद्भवली आहे, ज्यामुळे परिसरात घाणेरडे पाणी साचते, खड्डे पडतात.

# आचार्य दिवाकर पाटणे यांची विदर्भ कोऑर्डिनेटरपदी नियुक्ती



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ८ :

शिवसेनाचे (शिंदे गट ) हिंगणा विधानसभा सह संपर्क प्रमुख आचार्य दिवाकर पाटणे यांची विदर्भ कोऑर्डिनेटरपदी नियुक्ती करण्यात आली. समर्थगुरु मुरथल समर्थगुरु आश्रम (सोनीपत, हरियाणा) येथे तीन दिवसीय संसदीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी भारतातील स्टेट कोऑर्डिनेटर व नॅशनल कोऑर्डिनेटर सहभागी झाले होते. या कार्यक्रमात विदर्भ विभागासाठी आचार्य दिवाकर पाटणे यांची विदर्भ कोऑर्डिनेटर म्हणून समर्थगुरु धारेचे प्रमुख सिद्धार्थ औलियाजी यांच्या हस्ते नियुक्ती करण्यात आली.

कार्यक्रमात समर्थगुरु धारा चा प्रचार करणे, ब्लिसफुल लाइफ या संकल्पनेद्वारे लोकांना प्रशिक्षण देणे, वूमन एम्पॉवरमेंट, कॉर्पोरेट ट्रेनिंग तसेच स्ट्रेस मॅनेजमेंट ट्रेनिंग यांसारखे उपक्रम शासकीय कार्यालयांमध्ये आयोजित करण्याबाबतचे मार्गदर्शन करण्यात आले. आचार्य दिवाकर पाटणे यांच्या नियुक्तीबद्दल आचार्य महेंद्र नागपाल, अमोल नलगे, नागोराव कोहळे, मालती महाजन, चंदा चव्हाण आदीं अभिनंदन केले.

## सरन्यायाधीशांवरील हल्ल्याचा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीतर्फे जाहीर निषेध



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ८ :

कोर्टामध्ये कारवाई सुरू असताना भारताचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर राकेश किशोर नामक वकिलाने चप्पल भिरकावण्याचा प्रयत्न केला. या कृत्याचा जाहीर निषेध नागपूर शहर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद चंद्र पवार गटातर्फे संविधान चौक येथे करण्यात आला. यावेळी प्रामुख्याने राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख, पक्षाचे शहराध्यक्ष व माजी नगरसेवक दुनेश्वर पेठे, प्रदेश सचिव अफजल फारूक, प्रदेश महासचिव अविनाश गोतमारे, युवक काँग्रेस प्रदेश कार्याध्यक्ष शैलेंद्र तिवारी,उत्तर नागपूर चे महेंद्र भांगे,शहर उपाध्यक्ष सुरेश जिचकार, देवेंद्र घरडे, पवन गावंडे, महेश ठाकरे, नागपूर शहर विद्यार्थी आघाडी अध्यक्ष रुद्र धाकडे या संवेद महिला आघाडी व युवक आघाडी तसेच बहुसंख्य मात्रेने कार्यकर्ते उपस्थित होते.

## कल्याणमित्र बौद्ध विहारात धम्म संस्कार शिबीर



■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. ८ :

रामटेक तालुक्यातील शितलवाडी येथील कल्याणमित्र बौद्ध विहारात धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त ५ ऑक्टोबरला धम्म संस्कार शिबीर संपन्न झाले. यावेळी आंबेडकराइट्स बुद्धिस्ट सोसायटीचे संस्थापक रवी डंभारे, शेखर सांगोडकर, एकनाथ गजभिये, लीना मानकर, सीमा बागडे, संजय पाटील यांचे द्वारा बावीस प्रतिज्ञा, बौद्धांचे सण, उत्सव व संस्कृती या विषयावर मार्गदर्शन व चर्चासत्र करण्यात आले.

कार्यक्रमाचे संचालन रुस्तम मोटघरे, प्रास्ताविक साक्षोधन कडबे यांनी केले तर नितीन कराडे यांनी उपस्थितांचे आभार मानले. वैशाली वाघमारे व नंदा डुले यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. प्रस्तुत शिबिरात बहुसंख्य उपासक उपासिकांनी सहभाग नोंदवला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विक्रांत नंदेश्वर, प्रकाश डुले, तारा मेश्राम, शीला सहारे, कांचन गायकवाड, अंजली गेडाम यांनी मोलाचे योगदान दिले.

# भारतीय जनता पार्टी अनुसूचित जाती मोर्चा नागपूर ग्रामीण तर्फे निषेध आंदोलन

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. ८ :

भारतीय जनता पार्टी नागपूर जिल्हाध्यक्ष आनंदराव राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच अनुसूचित जाती मोर्चा नागपूर ग्रामीण जिल्हाध्यक्ष सतीश डोंगरे यांच्या नेतृत्वात भारताचे सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण आर. गवई यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला.

या निषेध आंदोलनाची सुरुवात संविधान चौक येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करुन करण्यात आली. संविधान आणि न्यायव्यवस्थेचे रक्षण हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य असल्याचा निर्धार व्यक्त करत सरन्यायाधीसांवर झालेल्या हल्ल्याचा संविधान चौकात जोरदार निषेध करण्यात आला. या प्रसंगी कार्यकर्त्यांनी एकमुखाने सरन्यायाधीशांवरील हल्ल्याचा निषेध नोंदवत, दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली.नागपूर जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी डॉ.विपिन इटनकर यांना निवेदन देऊन या प्रकरणी न्याय्य तपास आणि कारवाईची मागणी करण्यात आली. यावेळी अनुसूचित जाती मोचार्चे महामंत्री सुभाष गुजरकर, सानू गोरकर श्याम भीमटे, पवन खडसे, राहुल बागडे, सिद्धार्थ शिंदे, उपाध्यक्ष, प्रसिद्धी प्रमुख प्रयास ठवरे, अध्यक्ष कोराडी मंडळ ब्रह्माजी काळे,अध्यक्ष



तालुका ग्रामीण शेषराव पाटील,निलेश भाजीखाये सह या आंदोलनात भाजपा अनुसूचित जाती मोचार्चे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## जिल्हास्तरीय जिम्नॅस्टिक स्पर्धेत सेंटर पॉइंट स्कूलच्या विद्यार्थिनींची निवड




■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ८ :

तालुका क्रीडा संकुल, कोराडी येथे जिल्हा क्रीडा कार्यालय, नागपूर यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय जिम्नॅस्टिक स्पर्धेत सेंटर पॉइंट स्कूल, वर्धमान नगर येथील विद्यार्थिनींनी उल्लेखनीय कामगिरी करत विभागीय स्तरावर निवड मिळवली आहे. या स्पर्धेत 17 वर्षे आणि वर्षे -19 वयोगटाखालील मुलींच्या गटात आर्टिस्टिक जिम्नॅस्टिकसाठी मंथना काटे, हरिति सेवक, लिआना नाहटा, रिदमिक जिम्नॅस्टिकसाठी मंथना काटे या विद्यार्थिनींचा सहभाग होता. विद्यार्थिनींच्या या यशामागे त्यांचा प्रामाणिक प्रयत्न, सातत्यपूर्ण मेहनत आणि प्रशिक्षक पल्लवी खंडागळे यांचे मार्गदर्शन आहे. त्यांनी आपल्या यशाचे श्रेय प्रशिक्षक आणि पालकांना दिले आहे. शाळेच्या प्राचार्या कांचन उके, उपप्राचार्या दीपा चक्रवर्ती आणि जयती चक्रवर्ती यांनी विजयी विद्यार्थिनींचे अभिनंदन करून विभागीय फेरीसाठी शुभेच्छा दिल्या.

### निधन

## गुलाब घोडेस्वार

■ महासागर प्रतिनिधी
भिवापूर, दि. ८ :



भिवापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक अतुल घोडेस्वार यांचे वडील गुलाबराव घोडेस्वार (माजी संचालक बाजार समिती भिवापूर) वय ७२ वर्षे यांचा अल्पशा आजाराने आज ८ ऑक्टोबरला दुपारी ३:२५ वाजता दुःखत निधन झालेले आहे. तसेच उद्या दिनांक ९ ऑक्टोबरला रोज गुरुवारला सकाळी ११ वाजता त्यांच्यावर मरू नदी मोक्षधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात येईल असे आवहन घोडेस्वार परिवार व मित्र परिवार यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# आमदार मेघे यांच्या हस्ते दिव्यांगांना धनादेश वाटप

■ महासागर प्रतिनिधी
वानाडोंगरी, दि. ८ :

हिंगणा तालुक्यातील ग्राम पंचायत ईसासनी येथे ७५ दिव्यांगांना प्रत्येकी ५ हजार रूपयाचा धनादेश आमदार समीर मेघे यांच्या हस्ते व माजी जि.प. सदस्या अर्चना गिरी यांच्या अध्यक्षतेखाली वितरित करण्यात आले.

यावेळी माजी जि. प. सदस्य अंबादास उके, माजी जि.प.सदस्य धनराज आष्टनकर, माजी प.स.उपसभापती पुर्णिमा दिक्षित, प. स.सदस्य लिलाधर पटले, सरपंच अरविंद ढोणे, ग्रा सदस्य इंदु चौधरी, प्रिती राऊत, मिना मेश्राम, लहानूजी जिवतोडे, दादाराव मसराम, अश्विनी उईके, योगेश्वरी गायधने,जयश्री चव्हान, जयराम जांभळे, वरिष्ठ पत्रकार लिलाधर दाभे, माजी उपसरपंच कैलाश गिरी, माजी ग्रा. प. सदस्य विनोद ठाकरे , ग्राम विकास अधिकारी देशमुख प्रामुख्याने उपस्थित होते.

पुढिल कालावधित दिव्यांगांच्या स्वतःचा व्यवसाय स्थापण्या बाबतचा विचार केला जाईल त्या करीता ग्राम पंचायतीने सध्दा मदत करावी असे मत आमदार समीर मेघे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचालन सरपंच अरविंद ढोणे यांनी केले.



### अर्हत बुद्ध विहारात आ. मेघेचे जंगी स्वागत

ग्राम पंचायत ईसासनी वार्ड क्र.५ येथील अर्हत बुद्ध विहार पंचशिलनगर येथे ६९ व्या धम्मचक्र प्रर्वतन दिना निमित्त आयोजित कार्यक्रमात आमदार समीर मेघे यांच्या हस्ते तथागत बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुर्तिंना माल्यार्पण करण्यात आले. या वेळी बुद्ध विहार पंचकमेटीच्या महिलांनी आमदार मेघे यांना शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन जंगी स्वागत केले व गांवातील रस्ते व इत्तर समस्यांचे निवारण करण्यास जातीनी लक्ष दिले जानार असल्याची ग्रामस्थांना ग्वाही दल.

## दवलामेटीत विकास कामाचे भुमीपुजन

■ महासागर प्रतिनिधी, वाडी, दि. ८ :

दवलामेटी ग्रामपंचायत अंतर्गत असणा?्या विविध कामाचे २ कोटी रुपयाचे काम सरपंच गजानन रामेकर यांच्या प्रयत्नाद्वारे मंजुर झाले. दवलामेटी ते द्रुगधामना आलेसुर सेलु ( म्हाडा कॉलनी ) पर्यंत सिमेंट रस्त्याचे ५० लाख रुपयाचे भुमीपुजन, तसेच दीड कोटी रुपयाचे दवलामेटीतील पुरुषोत्तम नगर चौक येथे कौशल्य विकास सभागृहाचे भुमीपुजन आमदार समीर मेघे यांच्या हस्ते दवलामेटी सरपंच गजानन रामेकर, द्रुगधामना सरपंच मंगला रागीट , उपसरपंच बंडूभाऊ गजभिये, उपसरपंच अर्चना चौधरी,खडगावचे सरपंच देवराव कडू , कॉलेजचे संचालक उदय टेकाडे,योगेश रागीट, सुधाकर राऊत, सुजित नितनवरे, आनंदबाबु कदम, नितीन अडसड, संजय कपनीचोर यांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी विनोद चाफेकर, भीमराव मोटघरे, अजय जयस्वाल, सुनिल दुबे, श्रीकांत रामटेके, प्रकाश मेश्राम,शशिकुमार यादव, रवि खैरकर, प्रकाश डवरे, रमेश गोमासे, विजय पिसे , सुशिल बावणे, शितल वानखेडे ,रश्मी पाटील,छाया खिल्लारे ,वैशाली गजभिये, स्नेहा बिडवाईक, शरद कोहळे, आशा हिंगणेकर, छत्रपती शेंदरे, विजय पिसोळे, रोशन मेश्राम,भारत गजभिये उपस्थित होते.

# विदर्भ शाहीर कलाकार परिषदेची नव्याने कार्यकारिणी जाहीर

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ८ :

विदर्भ शाहीर कलाकार परिषद अंतर्गत नागपूर जिल्हा विदर्भ प्रदेश व महाराष्ट्र राज्यस्तरीय लोक कलाकारांची सर्वसाधारण सभा दिनांक 4 ऑक्टोंबर 2025 ला सकाळी साडेअकरा वाजता केंद्रीय अध्यक्ष मनीष भिवगडे यांच्या अध्यक्षतेखाली काटोल येथे पार पाडले.




सभेला प्रमुख केंद्रीय कार्याध्यक्ष अलंकार टेंभुरणें उपस्थित होते कार्यक्रमाचे जिल्हा अध्यक्ष दयालजी कांबळे यांनी आयोजन केले होते. तर सभेचे सूत्रसंचालन काटोल शाखा अध्यक्ष प्रफुल भुजाडे यांनी केले. प्रास्ताविक जिल्हा सरचिटणीस अरुण वाहने यांनी केले. तसेच मार्गदर्शन अरुण सहारे, विदर्भ उपाध्यक्ष शाहीर संजय मेश्राम, नरेंद्र डोंगरे, श्रीधर सोमकुवर, रामभाऊ धनजोडे यांनी सुद्धा मार्गदर्शन केले.

सभेला काटोल शाखा अध्यक्ष प्रफुल भुजाडे, उपाध्यक्ष शारदाताई टेकाडे, सचिव विजय कटरे, सहसचिव आशाताई मुंढे, कार्याध्यक्ष प्रमोद गायकवाड, कोषाध्यक्ष बंडूभाऊ वांदे तर मार्गदर्शक यादवराव भुजाडे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी काटोल कार्यकारिणीने मदत केली आभार प्रफुल भुजाडे यांनी मानून कार्यक्रम समाप्त झाल्याचे जाहीर केले.

समित्यांची निवड खालील प्रमाणे करण्यात आली नागपूर जिल्हास्तरीय कमिटी अध्यक्ष नरेंद्र डोंगरे उपाध्यक्ष शंकरराव होले, सरचिटणीस अरुणभाऊ वहाने, सहसचिव रोशन कांबळे, कोषाध्यक्ष महादेव भोंगाडे, संघटक श्रीधरजी सोमकुवर, प्रसिद्धी प्रमुख प्रशांत पवार, प्रवक्ता गंगाधर नागापुरे, महिला आघाडी नागपूर जिल्हा अध्यक्ष संगीताताई वाडबुदे, सदस्य रामभाऊ धनजोडे, रामदास मेश्राम तसेच महिला व पुरुष नियुक्त करण्यात आले.

यानंतर विदर्भ प्रदेश कार्यकारिणी घोषित करण्यात आली. यामध्ये अध्यक्षस्थानी देविदास कठाणे यांना घोषित करण्यात आले. सचिव सुधाकर खजूरीये, उपाध्यक्ष अरुण सहारे, प्रसिद्धी प्रमुख संजय खांडेकर, कोषाध्यक्ष नामदेवराव ठाकरे, संघटक पुरुषोत्तम निघोट, सहसचिव चंद्रशेखर कांबळे, महिला प्रतिनिधी संगीता भक्ती, मायाबाई गणोरकर, सोनाली गोंडाणे यांची निवड करण्यात आली.

शेवटी महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी घोषित करण्यात आली. यामध्ये अध्यक्ष शंकरराव चव्हाण, कार्याध्यक्ष यादवराव कान्होलकर, सरचिटणीस दयालजी कांबळे, उपाध्यक्ष शाहीर, संजय मेश्राम, प्रसिद्ध प्रमुख युवराज मेश्राम, संघटक रवी दलाल, कोषाध्यक्ष मिलिंद खोब्रागडे, सहसचिव छत्रपती समन्वयक, शंकरराव रामटेके, प्रवक्ता विजय डोंगरे, सदस्य संजय कडू रवी लाड, संजय भोयर तसेच महिला सदस्यांची नियुक्ती करण्यात आली.

## मनपाच्या शिवणयंत्र क्लस्टरचे अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी.यांच्या हस्ते उद्घाटन

# महिलांना मिळणार शिवणकामाचे प्रशिक्षण

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ८ :




दीनदयाल अंत्योदय योजनाझ्रराष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानाच्या माध्यमातून नागपूर महानरपालिकेच्या समाज विकास विभाग आणि आरोह मल्टीपरपज सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने पारडी, पुनापूर येथील कौशल्य विकास केंद्र येथे उभारण्यात आलेल्या स्वयंसहायता समूहातील महिलांकरिता शिवणयंत्र क्लस्टर आणि रोजगार निर्मिती प्रकल्पचे मनपाच्या अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी, यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

याप्रसंगी लकडगंज झोनचे सहायक आयुक्त विजय थुल, समाज विकास विभागाचे अधीक्षक राजेश मेश्राम, नूतन मोरे, विनय त्रिकोलवार, रितेश बांते, विनय टेंभूर्णे, आरोह संस्थेचे अध्यक्ष श्रीमती विशाखा राव, मुख्य कार्यकारी अधिकारी शर्मिष्ठा गांधी, निशिकांत जाधव इतर पदाधिकारी यांच्यासह मनपाचे इतर अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी वैष्णवी बी. म्हणाल्या की, महिलांचा सर्वांगीण विकास होणे गरजेचे आहे, त्याकरिता महिलांनी स्वतः पुढे येण्याची तसेच आपले प्रशिक्षण पूर्ण करण्याची गरज आहे. महिलांना रोजगार आणि कौशल्य मिळवून देणे ही महानगरपालिकेची पहिली प्राथमिकता आहे. महिलांना पुढे जाण्याकरिता ज्या प्रकारची मदत लागते, ती सर्व मदत मनपा मदत करेल. महिला सक्षम झाल्या तर संपूर्ण कुटुंबाचा विकास होईल, याकरिता मनपातर्फे आवश्यक पूर्ण मदत केली जाईल असे आश्वासन श्रवैष्णवी बी.यांनी यावेळी दिले. प्रशिक्षण केंद्रातून तयार होणारे उत्पादनाची गुणवत्ता दर्जेदार ठेवा आणि ऑनलाईन उत्पादन करण्याचाही प्रयत्न करावा अशा सूचना अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी, यांनी केल्या.

प्रास्ताविक करताना आरोह संस्थेच्या श्रीमती विशाखा राव यांनी आरोह करीत असलेल्या कामांची माहिती दिली. तसेच महिलांना प्रशिक्षण देऊन सुंदर उत्पादन केले जात आहे. तसेच या माध्यमातून रोजगार निर्मिती आणि महिलांचे सक्षमीकरण केले जात असल्याची माहिती दिली.

यावेळी समाज विकास विभागाच्या उपायुक्त डॉ. रंजना लाडे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या उद्घाटन सोहळ्यात प्रशिक्षणार्थी महिलांकडून स्वागत गीत सादर करण्यात आले.

# संपकाळातील सुरळीत वीजपुरवठ्यासाठी महावितरण सज्ज




## ७ वीज कर्मचारी संघटनांचा संप बेकायदेशीर

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ८ :

दि. ८ ऑक्टोबर २०२५: महावितरणमधील सात वीज कर्मचारी संघटनांच्या संयुक्त कृती समितीने दि. ९ ते ११ ऑक्टोबरपर्यंत संप पुकारला आहे. या तीन दिवसीय संपाच्या कालावधीत वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी महावितरणकडून आपत्कालिन नियोजन बुधवारी (दि. ८) पूर्ण झाले असून राज्यभरातील यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे. तसेच गंभीर कारणास्तव घेतलेल्या रजा वगळून सर्व अभियंते, अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या रजा रद्द करण्यात आल्या आहेत. रजेवरील कर्मचाऱ्यांना तातडीने कामावर रूजू होण्याची सूचना देण्यात आली आहे.

दरम्यान, व्यवस्थापनाकडून वारंवार सकारात्मक चर्चा व आवाहन करूनही संयुक्त कृती समितीने संपाचा निर्णय कायम ठेवला आहे. वीज ही अत्यावश्यक सेवा असल्याने नागरिकांची गैरसोय होऊ नये यासाठी महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षक अधिनियम (मेस्मा) लागू करण्यात आल्याने हा संप बेकायदेशीर ठरला आहे.

संपकाळात नागरिकांनी वीजपुरवठ्याबाबत कोणत्याही नकारात्मक व चुकीच्या संदेशावर विश्वास ठेवू नये. वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी पर्यायी यंत्रणा युद्धपातळीवर रात्रंदिवस सज्ज राहणार आहे. वीजपुरवठ्याबाबत काही तक्रारी किंवा शंका असल्यास २४ तास सुरु असलेल्या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा व संपाच्या कालावधीत सहकार्य करावे असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.

खासगीकरण व पुनर्रचनेच्या मुद्द्यांवर वीज कर्मचाऱ्यांच्या ७ संघटनांच्या संयुक्त कृती समितीने तीन दिवसांच्या संपाची नोटीस दिली. हा संप टाळण्यासाठी व्यवस्थापनाकडून वेळोवेळी चर्चा करण्यात आली. राज्याच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला आणि महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी सोमवारी (दि. ६०) स्वतंत्र बैठक घेऊन कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांशी विविध मुद्द्यांवर चर्चा केली. कोणत्याही प्रकारचे खासगीकरण होणार नाही अशी निःसंदिग्धपणे ग्वाही या बैठकींमध्ये देण्यात आली.

महावितरण कंपनीचे ३२९ उपकेंद्र कंत्राटी पद्धतीने चालविण्यास सुरवात केल्याचा आरोपही चुकीचा असल्याचे व्यवस्थापनाकडून स्पष्ट करण्यात आले. एप्रिल २०१९ नंतर तयार झालेल्या ३२९ उपकेंद्रांचे खासगीकरण करण्यात आलेले नाही. ही उपकेंद्र महावितरणच्या संबंधित कार्यालयांच्या अधिपत्याखालीच आहेत. या उपकेंद्रातील केवळ बाह्यस्त्रोत कुशल मनुष्यबळासाठी निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आली व त्यासंदर्भात संबंधित एजन्सींना कार्यादेश देण्यात आले. यात कोणत्याही प्रकारचे खासगीकरण नसल्याचे स्पष्ट करण्यात आले.

कर्मचारी संघटनांकडून आलेल्या मागणीनुसार प्रामुख्याने थेट ग्राहकसेवा देणाऱ्या उपविभाग व शाखा कार्यालयांमध्ये कार्यपद्धती सुधारणा करण्यात आली आहे. या कार्यालयांच्या फेररचनेत ग्राहकसंख्येनुसार अभियंता व तांत्रिक कर्मचाऱ्यांची संख्या निश्चित करण्यात आली आहे. त्यासाठी २ विभाग कार्यालय, ३७ उपविभाग आणि ३० शाखा कार्यालयांची नव्याने निर्मिती करण्यात आली आहे. या कार्यालयांमुळे ८७६ अभियंता व तांत्रिक कर्मचाऱ्यांची पदसंख्या देखील वाढली आहे. तर या फेररचनेत सध्या अस्तित्वात असलेल्या पदसंख्येत कोणतीही कपात होणार नाही. कर्मचाऱ्यांच्या आकृतीबंधाला व आरक्षणाला कोणताही धक्का बसणार नाही याची काळजी घेण्यात आल्याचे महावितरणकडून स्पष्ट करण्यात आले आहे. या फेररचनेची प्रायोगिक तत्त्वावर अंमलबजावणी सुरू झाली आहे. प्रायोगिक कालावधीत येणाऱ्या अडचणी किंवा सूचनांचा स्वीकार करून त्यानुसार अंतीम आदेश काढण्याचे धोरण स्वीकारण्यात आले आहे, हेही स्पष्ट करण्यात आले.

कृती समितीच्या सर्व मागण्यांबाबत व्यवस्थापनाकडून सकारात्मक प्रतिसाद देण्यात आला. नियमित संवाद व चर्चा करण्यासाठी दर महिन्यात प्रत्येक चौथ्या सोमवारी सर्व संघटनासोबत बैठक आयोजित करण्यात येत असल्याचे जाहीर करण्यात आले. तरीही संप मागे घेण्याबाबत कृती समितीकडून निर्णय होऊ शकला नाही. बुधवारी (दि. ८) दुपारी संचालक सचिन तालेवार (संचालन/प्रकल्प) व राजेंद्र पवार (मानव संसाधन) यांनी व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला. अतिवृष्टी व पूरपरिस्थितीच्या तसेच सणासुदीच्या पार्श्वभूमिवर नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी संप करू नये असे आवाहन केले. मात्र त्यास कोणताही प्रतिसाद मिळाला नाही.

संपात सहभागी झाल्यास कारवाईचा इशारा - वीज ही अत्यावश्यक सेवा असल्याने नागरिकांची कोणताही गैरसोय होऊ नये यासाठी राज्य शासनाने महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षक अधिनियम (मेस्मा) लागू केलेला आहे. त्यामुळे महावितरणमधील २३ पैकी ७ वीज कर्मचारी संघटनांची तब्बल तीन दिवसांचा संप बेकायदेशीर ठरला आहे. ज्यांची सेवा एक वर्षापेक्षा कमी झाली आहे किंवा ज्यांची नुकतीच थेट भरती प्रक्रियेत निवड झाली आहे ते संपात सहभागी झाल्यास त्यांची सेवा तात्काळ संपुष्टात येणार आहे. तसेच सुरवातीचे तीन वर्ष कंत्राटी म्हणून कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांची सेवा, संपात सहभागी झाल्यास रद्द होणार आहे. सेवेमध्ये नियमित झालेले कर्मचारी सेवेत सहभागी झाल्यास त्यांच्या सेवेत खंड देण्याच्या कारवाईची तरतूद आहे.

# परदेशी शिक्षणाच्या नावावर फसवणूक

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ८ :

अमेरिकेतील कोलंबस विद्यापीठात वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळवून देतो, अशी बतावणी करत विद्यापीठाच्या नावाने बनावट ई मेल, कागदपत्रांच्या आधारे चौघांनी संगनमत करत चार विद्यार्थ्यांची कोट्यवधी रुपयांनी फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार सोमवारी उघडकीस आला. यापैकी फसवल्या गेलेली सावनेर येथील तरुणी समृद्धी राजू पराते (२१) हिने सक्करदरा पोलिसांत धाव घेत तक्रार दिली. या चौघांनी समृद्धीला २५ लाख ६० हजार रुपयांचा गंडा घातला आहे. समृद्धी ही सध्या उझबेकिस्तान येथे वैद्यकीय अभ्यासक्रमाचे शिक्षण घेत आहे. तिच्या प्रमाणेच या तिघांनी आणखी तीन विद्यार्थ्यांकडूनही प्रत्येकी २५ लाख रुपये उकळल्याचीही माहिती मिळत आहे.

अतुल रमेशराव इंगोले, व्यंकट रेड्डी (रा. भानू टॉवर इरागुडा, हैदराबाद), उमंग पटेल (रा. अहमदाबाद, गुजरात) आणि शीतल (रा. सक्करदरा) अशी फसवणूक करणाऱ्या चौघांची नावे आहेत. धक्कादायक बाब म्हणजे परदेशी शिक्षणाच्या नावाखाली चौघांना कोट्यावधी रुपयांचा गंडा घालणारी ही टोळी नागपूरातीलच आहे.

अतुल इंगोले याने आधी कोपरगाव येथील आर. जे. कॉलेजचा अमेरिकेतील कोलंबस विद्यापीठाशी सामंजस्य करार असून वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी प्रवेश दिला जातो, अशी जाहिरात वर्तमानपत्रात प्रकाशित केली. ही जाहिरात वाचून समृद्धी पराते ही तरुणी सक्करदरा येथील पिपललिंक प्लेसमेंटच्या कार्यालयात पोचली. त्यावेळी अतुलने व्यंकट रेड्डी हा कोलंबस विद्यापीठाचा संचालक आणि उमंग पटेल हा मुख्य कार्यकारी अधिकारी असल्याची बतावणी केली. यावर समृद्धी परातेचा विश्वास बसल्याने तिघांनी तिच्याकडून नोंदणी, वसतीगृह, खानावळ आणि महाविद्यालय शुल्काच्या नावाखाली २८ लाख ६० हजार रुपये घेतले. बरेच दिवस झाले तरी प्रवेश पत्र न मिळाल्याने समृद्धीने विचारणा केली असता चौथा आरोपी सहकारी शितल याने पुढच्या तुकडीत प्रवेश मिळेल, असे सांगत समृद्धीचे वडील राजू पराते यांच्या खात्यावर ३ लाख रुपये परत केले. मात्र, तरीही प्रवेश मिळत नसल्याने फसवणूक झाल्याचे लक्षात येताच समृद्धी परातेच्या तक्रारीवरून पोलिसांनी चौघांविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला.

# कफ सिरपच्या उपयोगासंदर्भात भारत सरकारच्या दिशानिर्देशाचे पालन करा

## मनपा आरोग्य विभागाचे शासकीय व खासगी रुग्णालयांना पत्र

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ८ :

भारत सरकारच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाद्वारे लहान मुलांना कफ सिरपच्या युक्ती संगत वापराबाबत दिशानिर्देश जारी करण्यात आले आहेत. या दिशानिदेर्शाचे पालन करण्यासंदर्भात नागपूर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने नागपूर शहरातील सर्व शासकीय व खासगी रुग्णालयांना पत्र दिले आहे.

दुषित कफ सिरप मुळे काही बालकांचा मृत्यू झाल्याच्या घटना पुढे आल्यानंतर भारत सरकारने यासंदर्भात दिशानिर्देश जारी केले. या दिशानिदेर्शाचे शहरात पालन व्हावे, याद्दष्टीने मनपा आरोग्य विभागातर्फे रुग्णालयांना सूचना देण्यात आली आहे.




सद्यस्थितीत नागपूर शहरातील शासकीय व खासगी रुग्णालयांमध्ये ० ते १६ वर्ष वयोगटातील एकूण १२ रुग्ण आहेत. यातील मध्यप्रदेशातील १० व महाराष्ट्रातील १ आणि तेलंगणाचा १ रुग्ण आहे. यापैकी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (मेडिकल) मध्ये ६ रुग्ण उपचार घेत आहेत. एम्स मध्ये २ रुग्ण, न्यू हेल्थ सिटी हॉस्पिटलमध्ये १ रुग्ण, लता मंगेशकर हॉस्पिटलमध्ये १ रुग्ण, कलर्स हॉस्पिटलमध्ये १ आणि गेट वेल हॉस्पिटल १ रुग्ण उपचार घेत आहेत.

भारत सरकारच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने जारी केलेल्या दिशानिदेर्शानुसार, लहान मुलांमध्ये खोकल्याचे आजार हे स्वतःहून बरे होतात, अनेकदा ते औषधाशिवाय बरे होतात. यासाठी पुरेसा आराम आणि जास्त पाणी पिल्यामुळे व इतर गैरऔषधी उपाययोजना हे प्रथमोपचार पुरेसे असते. त्यामुळे २ वषार्खालील मुलांना सर्दी व खोकल्याकरिता औषध देणे टाळावे.

५ वर्षावरील मुलांना आवश्यकता असल्यास काळजीपूर्वक वैद्यकीय सल्ल्यानुसार व देखरेखीतच योग्य डोस मध्ये औषध द्यावी. बहुऔषधांचे संयोजन टाळावे. वैद्यकीय सल्ल्यानुसारच औषध घेण्याचे आवाहन देखील भारत सरकारने जनतेला स्थानिक संस्थेद्वारे केले आहे.

# डब्ल्यूसीएलमध्ये बनावट वैद्यकीय बिल घोटाळा

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ८ :

केंद्रीय अन्वेषण विभागाच्या नागपूर लाचलुचपत प्रतिबंधक शाखेने वेस्टर्न कोल फील्ड्स (डब्ल्यूसीएल) येथे झालेल्या बनावट वैद्यकीय बिल घोटाळ्याचा पदार्फाश केला आहे. या प्रकरणात सीबीआयने डब्ल्यूसीएलचे वैद्यकीय अधीक्षक (एमएस) आणि एका मेडिकल स्टोअरचे संचालक यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून तपास सुरू आहे. आरोपींमध्ये डॉ. पृथ्वी कृष्ण पट्टा, आणि सद्गुरू मेडिकलच्या संचालकाचा समावेश आहे. सीबीआय सूत्रांनुसार, हा घोटाळा डब्ल्यूसीएलने चालवलेल्या कॅशलेस मेडिकल योजनेअंतर्गत झाला आहे. डॉ. पृथ्वी कर्मचारी रुग्णांना काही औषधे लिहून देत होते, परंतु नंतर बिलांमध्ये महागड्या औषधांची किंमतही जोडली जात होती. मात्र ना रुग्णांना याबाबत माहिती राहात होते आणि ना त्यांना औषधे मिळत होती. हा घोटाळा लाखो रुपयांचा असू शकतो. सध्या, सीबीआयला ४-५ नमुना बिले मिळाली आहेत. ही बिले डब्ल्यूसीएल अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची आहेत. सद्गुरू मेडिकलचा संचालक डब्ल्यूसीएलशी संलग्न आहे. सर्व औषधे त्याच्याच मेडिकल स्टोअरमधून खरेदी करण्यात येत होती. डॉ. पृथ्वीच्या मदतीने बिलांमध्ये अधिक महागडी औषधे जोडून पैशांचा अपहार केला जात होता. सद्गुरूव्यतिरिक्त, इतर अनेक मेडिकल स्टोअर देखील डब्ल्यूसीएलशी संबंधित आहेत. औषधे फक्त बिलांवर सूचीबद्ध होती; प्रत्यक्ष औषधे खरेदी केली गेली नव्हती. सीबीआयच्या पथकाने गुन्हा दाखल करण्यासोबतच डॉ. पृथ्वीच्या हैदराबादमधील निवासस्थानाची आणि नागपूरमधील त्याच्या कार्यालयाची झडती घेतली आहे.

# मंगलवारी बाजार रोडवरील खड्डे जीवघेणे



■ प्रभू गजभिये, नागपूर, दि. ८ :

प्रभाग क्रमांक 1 अंतर्गत येणारा मंगलवारी बाजार रोड, जो रिंग रोडला लागून आहे, सध्या प्रचंड खड्ड्यांमुळे गंभीर परिस्थितीत आहे. या रस्त्यावरून दररोज शाळेत जाणारे विद्यार्थी, कामगार, आणि स्थानिक नागरिक ये-जा करतात. परंतु, रस्त्यावर मोठ्या प्रमाणात असलेले खड्डे नागरिकांच्या जिवावर बेतत आहेत. दररोज कुणीतरी तरी या खड्ड्यांमुळे घसरून पडतोय, जखमी होतोय.

मंगलवारी झोन क्रमांक 10 अंतर्गत येणाऱ्या नागपूर महानगरपालिकेला याबाबत अनेक वेळा लेखी आणि तोंडी तक्रारी करूनही कुठलीही ठोस कारवाई झालेली नाही.

स्थानिक नगरसेवक आणि उत्तर नागपूर विधानसभा क्षेत्राचे आमदार देखील या गंभीर प्रश्नाकडे दुर्लक्ष करत आहेत, असा नागरिकांचा आरोप आहे. बसपा उत्तर नागपूर विधानसभा माजी महासचिव विवेक किशोर सांगोड़े यांनी संतप्त प्रतिक्रिया देताना विचारले की, शासन आणि प्रशासनाला काय जनतेच्या जीवाशी खेळण्याचं कॉन्ट्रॅक्ट मिळालं आहे का?

स्थानिक सामाजिक कार्यकर्ते अंकित ठाकरे, अतुल करवाड़े, अतुल नंदेश्वर, पंजाब नंदेश्वर, हरीश, विनोद भाऊ, शैलेश करवाडे, मुकेश भया, मंगेश कानेकर, संकेत ठाकरे, बाडू भाऊ रंगारी, अर्जुन आणि इतर अनेक नागरिकांनी या समस्येवर तीव्र निषेध व्यक्त केला आहे.

"जर लवकरात लवकर मनपाकडून दुरुस्तीचे काम सुरू झाले नाही, तर आम्ही तीव्र आंदोलन छेडू. या परिस्थितीस संपूर्ण जबाबदारी महानगरपालिका, स्थानिक नगरसेवक, आणि आमदार यांची असेल असा इशारा संतप्त नागरिकांनी दिला आहे.

## महासागर प्रभाग वार्ता

# इसासनी वाघदरा परीसरात अस्वच्छतेचा कळस




■ प्रफुल्ल पाटणकर,
वानाडोंगरी, दि. ८ :

इसासनी वाघदरा ग्रामपंचायत परीसरात मोठ्या प्रमाणात नागरीकरण होत असुन काही भागात मोठ्या प्रमाणात नागरी सुविधांचा अभाव आहे. सौदामिनी सोसायटी शिव नगर, ओम नगर, विश्वकर्मा नगर, थोराणे ले आऊट या परीसरात खुल्या भुखंडामध्ये पावसाचे पाणी साचले असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

सतत होणाऱ्या पावसामुळे खोलगट भागात पाण्याचा निचरा योग्य होत नसल्याने सार्वजनिक व खासगी भुखंडावर पाणी साचले आहे. काही नागरिक कचरा टाकत असल्यामुळे परीसरात दुर्गंधी पसरली आहे तर मोठ्या प्रमाणात मच्छरांचा प्रादुर्भाव वाढला आहे त्यामुळे डेंग्यू, मलेरिया, हिवताप, विषमज्वर, मेंदू ज्वर तसेच काविळ हेपेटायटिस सारख्या जलजन्य आजाराचे प्रमाण वाढची संभावना आहे ग्रामपंचायत प्रशासनाने लक्ष देवून उपाययोजना कराव्यात अशी परीसरातील नागरीकांची मागणी केली आहे.

# उमरेड येथून प्रथमच पुणेसाठी थेट स्लीपर बस सेवा सुरू




■ महासागर प्रतिनिधी
उमरेड, दि. ८ :

सिंध राधे ट्रॅव्हल्स उमरेड तर्फे दिवाळी पूर्वी उमरेड ते पुणे एसी स्लीपर बस ची सुरुवात होत आहे. बस सेवा दररोज सायंकाळी पाच वाजता उमरेड बायपास वाघमारे वस्त्रालयजवळ सिंध ट्रॅव्हल्स कार्यालयातून बस सुटणार आहे.सेवा दिनांक 9 ऑक्टोबर पासून सुरुवात होत आहे.

बस मध्ये थंड एसी , साफ ब्लँकेट, बेडशीट, उशी, एअर फ्रेशनर, मोबाईल चार्जिंग, वॉशरूम, मिनरल पाणी बॉटल, इत्यादी सुविधा मिळणार आहे. सेफ्टी साठी अनुभवी ड्रायव्हर देखील या एजन्सी कडे आहेत. ही बस दररोज उमरेड हून वाया बुटीबोरी, वर्धा, पुलगाव, मार्गी थेट समृध्दी महामार्गाने पुणेला परीसरात शिरकापूर, वाघोली, खराडी बायपास, विमननगर, येरवाडा, संगमवाडी,नाशिक फाटा, निगडी, पर्यंत जाणार आहे. एकूण अकारा तासाचा प्रवास करीत सकाळी सहाला पुणे पहोचेल. 9 ऑक्टोबर पासूनचे दर हे 900 ते 1000 प्रति व्यक्ती राहण्याची शक्यता आहे. अधिक माहिती व संपर्कसाठी कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक वर 9921715131, व 9850334831 संपर्क करावेच आव्हान सिंध राधे ट्रॅव्हल्स कडून करण्यात आले आहे.

# मेहंदीबाग रेल्वे अंडर पास रस्त्यावरील खड्डयांमुळे अपघात आणि वाहतूक कोंडीची भीती

■ प्रदीप पौनिकर, नागपूर, दि. ८ :

प्रभाग क्र.५ च्या अंतर्गत मेहंदीबाग रेल्वे अंडर पास रस्त्यावर खड्डे पडल्यामुळे अपघात होण्याची भीती आणि वाहतूक कोंडीची शक्यता निर्माण झाली आहे. अंडर पास रस्त्यावर पावसाचे पाणी जमा झाल्याने रस्ता बंद होतो आणि नागरिकांना येणे जाण्यासाठी त्रास सहन करावा लागतो या समस्येचे त्वरित निराकरण होणे आवश्यक आहे जेणेकरून नागरिकांची सुरक्षा आणि वाहतूक सुरळीत राहील.

अंडर पास रस्त्यावर मोठे खड्डे पडले आहेत, ज्यामुळे वाहने खराब होण्याची आणि अपघात होण्याची शक्यता आहे. खड्डयांमुळे वाहतूक कोंडी होऊ शकते, ज्यामुळे नागरिकांना वेळेत पोहोचता येत नाही. खड्डयांमुळे दुचाकी आणि पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण झाला आहे. मेहंदी बाग रेल्वे अंडर पास रस्त्यावरील खड्डयांची त्वरित दुरुस्ती करावी. रस्त्यावर साइनबोर्ड लावून वाहकांना सावध करावे आणि वाहतूक सुरळीत करण्यासाठी पोलिसांची नियुक्ती करावी. अन्यथा आम आदमी पक्षाचा वतीने आणि स्थानिक नागरिकांच्या सहयोगाने तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा मनपा प्रशासनाला देण्यात आला



यावेळी प्रदिप पौनिकर, किशन निमजे, विजय नंदनवार, हेमराज कुंभारे, अनिल संभे, नानक धनवानी, आरती दलाल, संदीप साखरे, किशोर मौंदेकर, केतन ठाकूर दिपक कोदरलीकर, सुनिल गजभिये, दिलीप रामटेककर, राजू दुधे, मनोज फटींग, क्षितिज वंजारी, निलकंड टाकलीकर, हरिहर पराते, कृष्णा पाठराबे, प्रिती पौनिकर, स्वाती तारवानी, अंशु बिरेवार, अमोल उके संजू पटले, राजकुमार किटाळीकर जयघोष कोटांगले, गोविंदा के-ळवदकर, चेतन निखारे, अरुण गुणारकर, बाबुराव निमजे व समस्त आम आदमी पार्टीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# समता नगर ते राहुल नगर वळणाचा रस्ता धोकादायक




■ प्रमोद जांभूळकर,
वानाडोंगरी, दि. ८ :

प्रभाग क्रमांक १ समता नगरपासून राहुल नगरकडे जाणाऱ्या वळणावरचा रस्ता सध्या अत्यंत दयनीय अवस्थेत असून, स्थानिक नागरिकांच्या संतापाचा उद्रेक होत आहे. रस्त्यावरील खडी पूर्णपणे वर आली असून, अनेक ठिकाणी मोठमोठाले खड्डे पडले आहेत. यामुळे वाहनचालकांचे व नागरिकांचे प्रचंड हाल सुरू असून, अपघाताचे प्रमाणही दिवसेंदिवस वाढत आहे. गिट्टी व रेती सडकेवर आलेली असल्यामुळे दुचाकी वाहने घसरून अपघात होण्याचे प्रमाण वाढले आहे. या रस्त्याचा वापर सुगत नगर, नागार्जुन कॉलनी परिसरातील नागरिक व विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर करतात. रस्त्याची ही अवस्था त्यांच्यासाठी मोठ्या त्रासाचे कारण ठरत आहे. विशेषतः पावसाळ्याच्या दिवसात हा त्रास आणखी तीव्र होतो आहे. संजय अंबादे, प्रतीक जांभूळकर, विकास भागवतकर, कुंडलिक जांभूळकर, अतुल नंदेश्वर, घनश्याम जांभूळकर, भूषण नाईक, प्रभू गजभिये, प्रवीण शेंडे , दीपक साखरे यांच्यासह अनेक स्थानिक नागरिकांनी तातडीने रस्त्याचे डांबरीकरण करण्याची मागणी केली आहे.